सकाळ

# कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विविध उपक्रम

**हडपसर, ता. १० :** येथील कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त पंधरा दिवस या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

उपक्रमात बेसिक लाइफ सेव्हिंग टेक्निक कार्यशाळा आयोजित केली होती. त्यामध्ये डॉ. अविनाश पांडे यांनी मार्गदर्शन केले. विश्वराज हॉस्पिटलच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. रॅली आयोजित करून पर्यावरण संवर्धन व आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश दिला. सुरेश घुले, डॉ. शंतनू जगदाळे, योगेश ससाणे, सविता घुले, सानिया रेड्डी यांच्या हस्ते औषधी वनस्पती वृक्षारोपण करण्यात आले.

पदविका फार्मसी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील विविध महाविद्यालयांतून विद्यार्थी सहभागी झाले होते. आमदार चेतन तुपे, अमर तुपे यावेळी उपस्थित होते. महादेवनगर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. 'ट्रेन द ट्रेनर्स' कार्यक्रमात वक्त्या डॉ. ज्योती तांगडे यांनी सायबर सुरक्षा विषयावरील विविध धोके, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना, तसेच डिजिटल सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. रांगोळी स्पर्धेचेही यावेळी आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारती तुपे, वैशाली जाधव, उपस्थित होते. 'कार्बन अकाउंटिंग, कार्बन फुटप्रिंटिंग अँड कार्बन क्रेडिट्स : टूल्स फॉर लो कार्बन फ्युचर' या विषयावर डॉ. विद्या पाटणकर यांचे व्याख्यान आयोजित केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. आर. वाय. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व उपक्रम राबविण्यात आले.

Pune, Hadapsar-Today
11/08/2026 Page No. 5